# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १४-२३** **दिनांक १३/०१/२०२३**

## वाहन चोरी, जबरी चोरी, घरफोडी करणाऱ्या आरोपीतांना अटक करुण ८ गुन्हे उघडकीस वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण शाखेची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक २८/१२/२०२२ रोजी सायं. ७.०० वा. ते दिनांक २९/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा चे दरम्यान तुंगारेश्वर इंडस्ट्रीयल या कपंनीचे परिसरात कोणीतरी अज्ञात चोरटयाने प्रवेश करुन कंपनीचे समोरील गटारावरील ७ लोखंडी झाकण किंमत रुपये ७०,०००/- असा माल चोरी केल्याने वालीव पोलीस ठाणेत अज्ञात आरोपीताविरुध्द गु.रजि. क्र. २९/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे दाखल करणयात आला होता.

नमुद गुन्हयाचे अनुषगांने वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी वरिष्ठांच्या मागदर्शनाखाली तांत्रिक तपास व गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे अभिलेखावरील तसेच इतर आरोपीत नामे १) विकी नरेंद्र सिंग, वय- २१ वर्ष, वालीव, ता. वसई जि.पालघर २) हेंमत रमेश मोकाशी, वय- २५ वर्ष, रा. भोयदापाडा नाका, वसई (पुर्व) ३) अजित शिबु ठाकुर, वय- ३० वर्ष, वालीव वसई (पुर्व) ४) विघ्नेश केशव पारधी, वय- २२ वर्ष, वालीव, वसई (पुर्व) ५) मोतीम अब्दुल सज्जाक खान, वय- २१ वर्ष, रा. सोपारा फाटा, नालासोपारा (पुर्व) यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता तपासादरम्यान त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. तपासादरम्यान अरोपीतांकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील तसेच वनराई पोलीस ठाणे, मालाड पोलीस, मुंबई या पोलीस ठाण्याचे हददीत गुन्हे केल्याचे सांगितल्याने गुन्हयातील चोरीस गेलेली ॲटो रिक्षा, मोटारसायकल, गटारावरील लोखंडी झाकण, सिलेंडर बाटले, रोख रक्कम, ॲटो रिक्षाचे टायर, बॅनरच्या फ्रेम असा एकुण २,६०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील गुन्हे उघडकिस आले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा नोंदवही क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १ | वालीव | गु.र.नं. २९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९, ३४ प्रमाणे |
| २ | वालीव | गु.र.नं. ३९/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ३ | वालीव | गु.र नं ४७/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | वालीव | गु.र.नं. १२५७/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ५ | वालीव | गु.र.नं. १३५०/२०२२ भा.द.वि.सं कलम ४५४, ३८० प्रमाणे |
| ६ | वालीव | गु.र.नं. १२०६/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३९२, ५११ प्रमाणे |
| ७ | वनराई मुंबई | गु.र नं- ४४३/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ८ | मालाड मुंबई | गु.र नं- ५६२/२०१९ भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार तथा अति. कार्यभार परिमंडळ २, वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग तथा अति. कार्यभार तुळींज विभाग यांचे मागदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, श्री. मिलींद साबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे),सपोनि. ज्ञानेश/ फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम./ सचिन मोहिते, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी केली आहे.

-----ooo----